डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८११९०८०२०

**संदर्भ : रासेयो/४८६/१७** **दि. ०४/०१/२०१७**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी,**

**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**

**पुणे शहर**

**विषय : राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत...**

**मा. महोदय,**

पुणे शहरामधील वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. वाहतुकीच्या समस्यांवर उपाययोजना व वाहतुक व्यवस्थेमध्ये कोणत्या प्रकारची सुधारणा करावयाची याबाबत विचार करण्याची वेळ आली आहे. त्यानुसार **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व पुणे शहर पोलीस–वाहतूक विभाग** यांच्या संयुक्त विद्यमाने **राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत 'पुणे शहरातील वाहतूक सुधारणेबाबत नागरिकांची भुमिका'** याविषयावर पुणे शहरामधील स्वयंसेवकांकरिता **दि. १६ जानेवारी २०१७** रोजी **व्यवस्थापन शास्त्र सभागृह** (PUMBA), **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** याठिकाणी **स. ११.०० वा.** वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेमधील प्रथम तीन विजेत्या स्पर्धकांना **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व पुणे शहर पोलीस–वाहतूक विभाग** यांच्या वतीने स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र यास्वरुपात पारितोषीक देण्यात येणार आहे. तसेच स्पर्धेमध्ये सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

तरी आपल्या महाविद्यालयातील वक्तृत्वस्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या १ विद्यार्थी अथवा १ विद्यार्थीनी यांची नावे **दि. १३ जानेवारी २०१७** पर्यंत पुढील नमुन्यात nss_student_list@pun.unipune.ac.in या मेल आयडीवर (मेलचा विषय Elocution Competition Student List या विषयासह) मेलद्वारे पाठवण्यात यावीत, ही विनंती. तसेच नावे पाठविलेल्या विद्यार्थ्यांना **दि. १६ जानेवारी २०१७** रोजी **व्यवस्थापन शास्त्र सभागृह** (PUMBA), **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** या ठिकाणी **सकाळी १०.०० वाजता** स्पर्धेकरीता पाठविण्यात यावे. स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमामधून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

| क्र. | स्वयंसेवक नाव | महाविद्यालयाचे नाव | वर्ग | संपर्क |
|---|---|---|---|---|
| | | | | |

स्पर्धेची नियमावली स्पर्धेपुर्वी जाहिर करण्यात येईल.

**प्र. कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**